॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि. १ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांची महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय उच्चतर शिक्षा परिषदेवर नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून या संदर्भात अधिसुचना जारी करण्यात आली आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री हे परिषदेचे अध्यक्ष असतात. या परिषदेवर तीन कुलगुरूंची नामनिर्देशित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यामध्ये प्रा. माहेश्वरी यांच्या नावाचा समावेश आहे. परिषदेवर महाराष्ट्रातील संलग्नित महाविद्यालयांचे दोन प्राचार्य, कला, विज्ञान-तंत्रज्ञान, सांस्कृतिक, उद्योग, व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास या क्षेत्रातील नऊ तज्ज्ञांचा देखील समावेश आहे. तसेच उच्च व तंत्रशिक्षणाचे प्रधान सचिव व संचालक यांचाही समावेश आहे. परिषदेच्या सदस्यांचा कार्यकाळ तीन वर्षाचा आहे. महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय उच्चतर शिक्षा परिषद हीच महाराष्ट्र राज्यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान आणि प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान या योजनांसाठी राज्य उच्च शिक्षण परिषद समजली जाईल. उच्च शिक्षणाचा आराखडा तयार करणे, उच्च शिक्षणाला उद्योगाभिमूख बनविणे, गुणवत्तेत सुधारणा करणे, उच्च शिक्षणाच्या गुणवत्ता सुधारण्यासाठी राज्य शासनाला सल्ला देणे आदी कार्य या परिषदेचे आहे. प्रा. माहेश्वरी यांच्या नियुक्तीमुळे खान्देशाला हा मान मिळाला आहे.

**बातमी क्रमांक २**

जळगाव दि. १ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने "विदेशा भाषा आणि नोकरीच्या संधी" या विषयावर एक दिवशीय वेबिनार घेण्यात आला.

जपानी भाषा प्रशिक्षक माया नरसापूर, जर्मन भाषा प्रशिक्षक श्रेया पाठक व फ्रेंच भाषा प्रशिक्षक विकी कुमार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. भाषा हे संपर्काचे माध्यम असून परदेशातही रोजगाराच्या संधी आहेत. विदेशी भाषा शिकून करिअर करता येवू शकते. आपल्या देशासोबत व्यापार वाढीला लागला असून विविध भाषेतील तज्ज्ञांची गरज वाढली आहे. पर्यटन, मनोरंजन, वाणिज्य, आयटी, विज्ञान, बँका यासारख्या क्षेत्रात उत्तम संधी असल्याचे मत या तज्ज्ञांनी व्यक्त केले. विभागाचे संचालक प्रा. आशुतोष पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. मनिषा जगताप यांनी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

.........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२३ दिनांक: १ नोव्हेंबर, २०२३

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी